वाचले:- १) महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतन ) नियम-१९८२ मधील नियम १०(१)

२) मा. आयुक्त यांचेकडील अधिकार प्रदान आदेश क्र. प्रशा/२/कावि/४४७/१५, दि. २०/१०/२०१५.

३) मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय भोसरी यांचे दि.१४/०६/२०१६ रोजीचे पत्र.

४) मा. लेखाधिकारी यांचेकडील दि. २५/०५/२०१६ चे घरबांधणी अग्रीम नाहरकत प्रमाणपत्र.

५) मा. शिक्षणाधिकारी यांचेकडील दि.२० /०६/२०१६ चा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८
माध्यमिक शिक्षण विभाग
क्र. माध्य/शि/१/कावि/८७९/१६
दि. २० /०६/२०१६

विषय – <u>नियत वयोमानानुसार सेवानिवृतीबाबत.</u>
श्री.गाडेकर बाळु बापु सहाय्यक शिक्षक(संगणक क्रं.५८७२)

आदेश,

श्री.गाडेकर बाळु बापु, सहाय्यक शिक्षक हे पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर सहाय्यक शिक्षक या पदावर माध्यमिक शिक्षण विभागात दि.१२/०३/१९८४ रोजी रूजू झालेले आहेत श्री.गाडेकर बाळु बापु, सहाय्यक शिक्षक यांची जन्मदिनांक ०२/०६/१९५८ अशी असून त्यांच्या वयास दिनांक ३०/०६/२०१६ रोजी ५८ वर्षे पूर्ण होत असल्याने श्री.गाडेकर बाळु बापु, सहाय्यक शिक्षक,यांना ३०/०६/२०१६ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार सेवानिवृत करणे आवश्यक आहे.

शासकीय कर्मचारी तो ज्या महिन्यात ५८ वर्ष वयाचा होईल, त्या महिन्याच्या अखेरच्या दिवशी मध्यान्होत्तर सेवानिवृत होईल, तसेच ज्या शासकीय कर्मचा-याची जन्मतारीख ०१ असेल तो कर्मचारी यथास्थिती ५८ वर्ष वयाचा होताच मागील महिन्याच्या शेवटच्या दिवशी मध्यान्होत्तर सेवानिवृत होईल, अशी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम-१९८२ मधील नियम १०(१) मध्ये तरतूद आहे.या तरतूदीप्रमाणे श्री.गाडेकर बाळु बापु,, सहाय्यक शिक्षक, हे दिनांक ३०/०६/२०१६ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार मध्यान्होत्तर सेवानिवृत होतील.

श्री.गाडेकर बाळु बापु, सहाय्यक शिक्षक,यांचे विरूध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावीत नाही. तसेच श्री.गाडेकर बाळु बापु,, सहाय्यक शिक्षक, यांचे कडून महानगरपालिकेस भुखंड कर्ज, घरबांधणी कर्ज, वाहन कर्ज, संगणक कर्ज, घर दूरूस्ती कर्ज, वैद्यकीय अग्रीम यांचेकडील कर्ज येणे बाकी नसलेबाबतचे दाखले त्यांनी सादर केले आहेत. घरबांधणी अग्रीम थकबाकी नसलेबाबत वाचले क्र.४ अन्वये मा. लेखाधिकारी यांनी अभिप्राय दिलेला आहे. श्री.गाडेकर बाळु बापु, सहाय्यक शिक्षक यांचे सेवानिवृत्ती बाबत मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय भोसरी शिफारस केलेली आहे.



Scanned with CamScanner

श्री.गाडेकर बाळु बापु, सहाय्यक शिक्षक, यांना सेवासातत्य देण्यात आलेले नाही.

सबब, मी शिक्षणाधिकारी, माध्यमिक शिक्षण विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी-१८, उपरोक्त संदर्भ क्र. २ अन्वये विभाग प्रमुख म्हणून मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतन ) नियम-१९८२ मधील तरतूदी नुसार या आदेशान्वये श्री.गाडेकर बाळु बापु,सहाय्यक शिक्षक, यांना दिनांक ३०/०६/२०१६ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणेस मान्यता देत आहे. प्रस्तुत आदेशाची सविस्तर नोंद श्री.गाडेकर बाळु बापु, सहाय्यक शिक्षक यांचे सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

20/6/16

शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रती,
श्री.गाडेकर बाळु बापु, सहाय्यक शिक्षक,
माध्यमिक विद्यालय भोसरी

प्रतः- १) लेखा शाखा
२) प्रशासन,कर्मचारी वैयक्तिक नोंदकक्ष,संगणक कक्ष,(प्रशासन) सेवाजेष्ठता कक्ष, मागासवर्गीय कक्ष, कामगार कल्याण विभाग
३) माध्यमिक विभाग टेबल क्रं. २ व ४
४) माध्यमिक विद्यालय --------------
२/- पुढील कार्यवाहीसाठी



Scanned with CamScanner